राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.३४/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २४ डिसेंबर, २००५.

**आ दे श**

महाराष्ट्रातील अपंग मतदारांना मतदानाच्यावेळी काही सुविधा देण्याचा प्रश्न बरेच दिवस राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होता. त्यावर राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

सार्वत्रिक निवडणुकीत अथवा पोटनिवडणुकीच्यावेळी मतदार यादी प्रथम जनतेच्या हरकती व सूचनांसाठी प्रसिध्द करण्यात येते. या हरकती व सूचना मुख्यत्वे करुन एका प्रभागातील उमेदवाराचे नांव दुस-या प्रभागात तर आले नाही याबाबत असते. याच कालावधीमध्ये संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थातील अपंग मतदारांना आपली नांवे देण्याचे आवाहन करण्यात यावे. त्यांनी नाव देताना आपला मतदार यादी क्रमांक, भाग क्रमांक व मतदार क्रमांक नमूद करावा.

जे अपंग मतदार आपली नांवे देतील त्याबाबत संबंधित मतदार यादी करणारे अधिकारी यांची जबाबदारी राहील की, त्या मतदारांची नांवे तळमजल्यावरील मतदान केंद्रात येतील याची दक्षता घ्यावी. कारण ब-याचदा एका इमारतीमध्ये तळमजल्यावर व वरच्या मजल्यावर असे मतदान केंद्र असते. जर अपंग मतदाराचे नांव वरच्या मजल्यावरील मतदान केंद्राच्या मतदार यादीत असेल तर ते तेथून कमी करुन तळमजल्यावरील मतदान केंद्राशी संबंधित मतदार यादीमध्ये पुरवणी म्हणून जोडण्यात यावे.

जर एखादया मतदान केंद्रावर ५ पेक्षा जास्त अपंग मतदार असतील तर त्या मतदान केंद्रावर चढाव (Ramp) पुरविण्यात यावा.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

J.12431(222)